**प्रेसनोट दिनांक ०८/०३/२०१९**
**खडक पोलीस स्टेशन,पुणे शहर**

**खंडणी गुन्ह्यातील दिड वर्षापासून फरारी आरोपी महिलेस खडक पोलीस ठाणेकडुन जेर बंद.**

दिनांक ०३/०१/२०१८ रोजी इसम नामे प्रविण सोनिग्रा यांचे मालकीचे ३८६/१,भवानीपेठ, पुणे येथील घराचा विकसना करीता कायदेशीर ताबा घेत असताना त्यास हरकत घेत महिला नामे शबाना इकबाल शेख व तिचे साथीदारांनी प्रविण सोनिग्रा यांना ताबा घेण्यासाठी मारहान करून १०,०००/- रू.ची खडणी मागीतल्याबाबत प्रविण सोनिग्रा यांनी दिलेल्या तक्रारी वरून खडक पोलीस ठाणे येथे गु.र.नं.०३/२०१८,भादवि कलम ३८७,३५२,५०६(१),३२३,५०४,३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला दाखल गुन्ह्यावरून खडक पोलीस ठाणेकडील पोलीसांनी महिला आरोपी शबाना शेख हिचे साथीदार इकबाल शेख,अरबाज शेख व आझम शेख यांना यापुर्वी अटक केली होती परंतू महिला आरोपी शबाना इकबाल शेख ही आपली अटक चुकवीण्याकरीता फरार झाली होती.

सदर आरोपी महिला तिचे घरी येणार असल्याची माहिती पोलीस कर्मचारी महेश बारावकर यांना मिळाली वरीष्ठ अधिकारी यांचे मागर्दशनाखाली खडक पोलीस ठाणे कडील अधिकारी व कर्मचारी यांनी सदर महिलेच्या घराचे आजुबाजूस सापळा रचला असता सकाळी ०६/४५ वा.सदर आरोपी महिला नामे शबाना इक्बाल शेख वय ३७ वर्ष रा.अ-६,भवानीपेठ,चुडामन तालीम चौक,पुणे.हिला ताब्यात घेण्यात आले आहे.सदर आरोपी महिले विरूध्द पुणे शहरातील विवीध पोलीस ठाणेचे हद्दीत जबरी चोरी,गैरकायद्याची मंडळी जमवून भांडणे करणे अशा विवीध प्रकारचे गुन्हे दाखल आहेत.

सदर कारवाई ही मा. रविंन्द्र सेनगावकर अप्पर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग पुणे, मा. सुहास बावचे पोलीस उप आयुक्त सो॥, परि-१ पुणे शहर, मा. प्रदिप आफळे सहा.पोलीस आयुक्त सो॥, फरासखाना विभाग पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली राजेंन्द्र मोकाशी वरिष्ठ पोलीस निरीक्षक,खडक पोलीस स्टेशन, पुणे. उमाजी राठोड,सहा.पोलीस निरीक्षक व पोलीस कर्मचारी निमल शिंदे,गैारी राजगुरू,महेश बारावकर,महेश कांबळे,इम्रान नदाफ,विठ्ठल पाटील यांनी सहभाग घेतला.

ता. ०८/०३/२०१९

**( राजेन्द्र मोकाशी )**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
खडक पोलीस ठाणे, पुणे शहर